# मेट्रो ३ चे ७० टक्के भुयारीकरण पूर्ण

## १४.७५ कि. मी.चे भुयारीकरण शिल्लक : वर्षभरात काम पूर्ण होण्याची शक्यता : गुप्ता

प्रतिनिधी
मुंबई

मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारा (एमएमआरसीएल) राबविल्या जाणाऱ्या मेट्रो मार्ग ३ चे मागील २ वर्षांत ७० टक्के भुयारीकरण पूर्ण झाले. एकूण ५५ कि. मी. भुयारीकरणापैकी ३८.२५ कि. मी.चे भुयारीकरण करण्यात आले आहे. मेट्रो ३ प्रकल्पाच्या पूर्णत्वाच्या दृष्टीने हा एक अतिशय महत्वाचा टप्पा आहे. हे खडतर आव्हान पूर्ण करण्यासाठी मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन, त्यांचे तांत्रिक सल्लागार आणि कंत्राटदार यांची अनेक पथके यासाठी अहोरात्र कार्यरत आहेत.

| पॅकेज | मार्ग | भुयारीकरणाची टक्केवारी |
|---|---|---|
| १ | कफ परेड ते हुतात्मा चौक स्थानक | ५८ |
| २ | 'सीएसटी' ते ग्रँटरोड स्थानक | ८६ |
| ३ | मुंबई सेंटर ते वरळी स्थानक | ३८ |
| ४ | सिद्धिविनायक ते शितालादेवी मंदिर स्थानक | ७४ |
| ५ | धारावी ते सांताक्रुझ स्थानक | ७४ |
| ६ | आंतरदेशीय विमानतळ ते आंतरराष्ट्रीय विमानतळ स्थानक | ६० |
| ७ | मरोळ नाका ते आरे स्थानक | ९७ |

मुंबईच्या वाहतूक व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडविण्यासाठी आकारास येत असलेल्या मेट्रो लाईन ३ चे काम अतिशय वेगाने आणि शिस्तबद्धरितीने पुढे जात आहे. राज्याच्या राजधानीचा भौगोलिक भूभाग हा अभियांत्रिकी दृष्टीकोनातून अतिशय आव्हानात्मक आहे. परंतु, हे सर्व अडथळे समर्थरितीने पार करून आज ७० टक्के भुयारीकरणाचा यशस्वी टप्पा गाठला गेला आहे. एकूण ३३.५ कि. मी. भूमिगत मार्गासाठी अप आणि डाऊन लाईन असे ५५ कि. मी.चे भुयारीकरण करावे लागणार आहे. मेट्रो ३ चे संपूर्ण भुयारीकरण ३२ टप्प्यात पूर्ण होणार असून आतापर्यंत २३ टप्पे पूर्ण झाले आहे.

व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यासंदर्भात म्हणाल्या, हा प्रकल्प पूर्ण करताना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. परंतु, सर्व परिस्थितीला मेट्रो ३ च्या टीमने समर्थपणे तोंड देत हे यश मिळविल्याचा सार्थ अभिमान आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर मुंबईच्या वाहतूक व्यवस्थेत लक्षणीय बदल दिसून येतील. रोजच्या ६.५ लाख वाहन फेऱ्या कमी होऊन प्रदूषित वायूंचे प्रमाण प्रतिवर्षी २.६१ लाख मेट्रिक टन एवढे कमी होईल. ७० टक्के भुयारीकरण होणे म्हणजे या प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीच्या दृष्टीने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे.

आतापर्यंतचा भुयारीकरणाचा विचार करता पॅकेज ७ आघाडीवर असून या पॅकेजमध्ये ९७ टक्के बोगदा खणण्यात आला आहे. १२ डिसेंबर २०१९ पर्यंत येथील १०० टक्के काम पूर्ण होणे अपेक्षित आहे. एकूण ३८.२५ कि. मी.चे भुयारीकरणासाठी २७०३० रिंग्जचा उपयोग करण्यात आला. येत्या वर्षात उर्वरित ९ टप्पे पूर्ण होणे अपेक्षित आहे, अशी माहिती 'एमएमआरसीएल'चे प्रकल्प संचालक एस. के. गुप्ता यांनी दिली.